प्र. कि–३

शिक्षण व सेवायोजन विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई – ४०० ०३२
दिनांक : 2 नोव्हेंबर, १९८३.

प्रति,
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे.

विषय :– सिध्देश्वर इंग्लिश मिडियम स्कूल, पुणे
परवानगी मिळणेबाबत.

भोसरी जिल्हा पुणे येथील सिध्देश्वर इंग्लिश मिडियम स्कूल या नावाने सुरु असलेल्या प्राथमिक शाळेस शासनाने घातलेली सर्वसाधारण बंदीची अट अंशत: शिथिल करुन अपवादात्मक परिस्थितीत "खास बाब" म्हणून कायम विना अनुदान तत्वावर खालील अटींच्या अधीन राहून शासन मंजूरी देत आहे.

१. नियमानुसार संस्था रजिस्टर्ड असली पाहिजे.

२. संस्थेने ही प्राथमिक शाळा कायम विना अनुदान तत्वावर चालविण्याची व भविष्यकाळात कधीही शासनाकडे अनुदानाची मागणी करणार नाही अशी लेखी संमती दिली पाहिजे.

३. संस्थेने शाळेचा एकूण शिक्षक वर्ग विहित वयोमर्यादित व प्रशिक्षित [एस. एस. सी. डी. एड.] नेमलाच पाहिजे व त्यांना शासनाने ठरवून दिलेले वेतन व भत्ते दिले पाहिजेत.

४. संस्थेने शाळेसाठी स्वतंत्र व आधुनिक शैक्षणिक साहित्याने परिपूर्ण अशी स्वत:ची इमारत उपलब्ध केली पाहिजे.

५. शाळेतील प्रत्येक वर्गामध्ये शासनाने ठरवून दिलेली विद्यार्थी पटसंख्या व हजर संख्या असली पाहिजे.

६. संस्थेने जवळपासच्या शाळेवर आपल्या शाळेमुळे कोणताही दुष्परिणाम होणार नाही याची दक्षता घेतली पाहिजे.

७. शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशाचे संस्थेने पालन केलेच पाहिजे.

८. शाळेच्या फीचे दर शासनाने विहित केल्यानुसार असले पाहिजेत. त्यापेक्षा जादा फी घेता कामा नये.

सही/-

Principal
Sidheshwar High School